# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरातील मौजा-धंतोली शिट क्र.(६१) १४ III न.भु.क्र. ६४८ ते
**{मालमत्ता विभाग}** ७२४ आराजी ४.५८ एकर जागेवरील मंजूर अभिन्यासातील भंगी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर संस्थेला दिलेल्या जागेचे नुतनीकरण करुन वास्तव्य करीत असलेल्या संस्थेच्या सभासदांना व त्यांच्या वारसदारांना स्वतंत्र लीज डीड करुन देण्याबाबत.

नागपूर महानगरपालिका ठराव क्र. ३९ दि. ०३.०३.१९५६ अन्वये १ आणा चौ.फुट प्रमाणे भंगी समाजाचे सफाई कर्मचा-यांची वसाहत तयार करण्याकरीता मौजा-जाटतरोडी/धंतोली येथील ४.५८ एकर जागा भंगी को-ऑप. हॉऊसींग सोसायटीला ३० वर्षाचे लीज करुन दिलेली आहे. सदर ठरावात खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद आहे.

१) ज्याअर्थी या वस्तीतील सार्वजनिक संडास व विहीरीसाठी झालेला खर्च रु. ५४००/- वजा जाता बाकी रु. ३६००/- या वस्तीच्या इतर दुरुस्तीकरीता म.न.पा.ने खर्च केलेले आहे. त्याअर्थी १ आणा प्रती चौ.फुट दराने येथील भुखंडके ३० वर्षाकरीता भाडेपट्टा दराने दयावे.
२) वरिल दराप्रमाणे प्रत्येक भुखंडाचे जे प्रिमीयम येईल ते प्रिमीयम म्हणून वसुल करावे व त्यावर नेहमीप्रमाणे शेकडा रु. २/- दराने भुभाडे आकारण्यात यावे.
३) वरिल सवलतीचे दराने या योजनेतील भुखंड महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या भंगी समाजाच्याच कर्मचा-यांना देण्यात यावा.
४) या वस्तीचा अभिन्यास ठक्करग्राम धर्तीवर योग्य त-हेने करावा.

**विषयांकित प्रकरणातील ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे आहे. :-**

- मनपा ठराव क्र. ३९ दि. ०३.०३.१९५६ अन्वये मौजा - धंतोली येथील ४.५८ एकर जागा भंगी को. ऑप.हा. सोसायटीला सन १९५६ मध्ये ३० वर्षीय स्थायी भाडेपट्ट्यावर (निवासी वापरासाठी) आवंटीत करण्यात आलेली आहे. ३० वर्षाची लीज सन-१९८६ ला संपुष्ठात आलेली असून भाडेपट्टयाचे नुतनीकरण सोसायटीने केलेले नाही.
- भंगी को. ऑप. हा. सोसायटीने ना.सु. प्र. तर्फे एकुण ७६ भूखंडाचा अभिन्यास मंजूर करुन त्यावर सोसायटीद्वारे सभासदासाठी क्वार्टर बांधण्यात येवून ती ७१ सभासदांना आवंटीत केल्याची नोंद मूळ नस्तीत यादी उपलब्ध आहे.
- नगर भुमापन विभागाचे आखीव पत्रिकेनुसार, हक्काचा मुळधारक महानगरपालिका, पट्टेदार भंगी को. ऑप. हा. सोसायटी असून इतरभार म्हणून सभासदाचे नाव नमूद आहे. परंतु सोसायटीद्वारे सभासदांना ॲलॉटमेंट पत्रक दिल्याचे दस्तावेज नस्तीत उपलब्ध नाही.
- भंगी को. ऑप हा, सोसायटी सद्यास्थितीत बरखास्त असून मुख्य अवसायक यांची नेमणूक झालेली आहे.

भंगी को. ऑप. हा. सोसायटीमधील सभासदांना स्वतंत्र लीज करुन देणेबाबत उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांचे पत्र क्र. उपनिश-१/नियमन/गृहनिर्माण/सुनावणी/२९२५/२०२२ दि. २४.०५.२०२२ तसेच दि. २१.०७.२०२२ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे. तसेच परीसरातील लोकप्रतिनीधी द्वारे सुध्दा सदर मागणीबाबत निवेदने प्राप्त आहेत. सोसायटी मधील वास्तव्यात असलेले सभासद व वारसांनी भंगी समाज युवा मंच द्वारे सदर मागणी केलेली आहे.

मुख्य अवसायक, भंगी गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादीत नागपूर यांनी मौजा-धंतोली जाटतरोडी येथील भुमापण क्र. ६७७ येथील जागेवरील सभासदांवर दि.महाराष्ट्र स्टेट कॉ. हॉ. फायनान्स लि. मुंबई कडुन कोणत्याही प्रकारचे कर्ज/गहाण नसुन वास्तव्य करीत असलेल्या सभासदांना/वारसदारांना/भुखंडधारकांना

स्वतंत्र लीज डीड करुन देण्यास हरकत नाही असे मुख्य अवसायक यांनी दि.१५.०१.२०२४ रोजी लेखी पत्र दिले आहे.

भंगी गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादीत नागपूर संस्थेचे मुख्य अवसायक यांना महाराष्ट्र को-ऑप. सोसायटीज अॅक्ट १९६० नुसार सर्व अधिकार प्राप्त असल्याने मागणी केल्यानुसार सोसायटीच्या नावे सदर जागेचे नुतनीकरण न करता सभासद/वारसदार/भुखंडधारकांकडुन मागील थकीत भुभाडे व इतर शुल्क वसुल करुन भाडेपट्टयातील सर्वसाधारण अटी व शर्तीप्रमाणे पुढील १० वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक आहे.

करिता उपरोक्त प्रमाणे, मौजा-धंतोली शिट क्र.(६१) १४ III न.भु.क्र. ६४८ ते ७२४ आराजी ४.५८ एकर जागेवरील भंगी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर संस्थेला दिलेल्या जागे अंतर्गत न.भु. विभागाचे आखीव पत्रिकेवर इतर भारात नमूद असणाऱ्या ७६ प्रकरणामध्ये, आखीव पत्रिकेवर नमूद क्षेत्रफळापुरता ज्यांचे नाव असेल त्यांच्या नावाने किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना वैयक्तिक लीज डीड करुन देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 45/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 09/02/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), स्थावर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील मौजा-धंतोली शिट क्र.(६१) १४ III न.भु.क्र. ६४८ ते ७२४ आराजी ४.५८ एकर जागेवरील मंजूर अभिन्यासातील भंगी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर संस्थेला दिलेल्या जागेचे नुतनीकरण करुन वास्तव्य करीत असलेल्या संस्थेच्या सभासदांना व त्यांच्या वारसदारांना स्वतंत्र लीज डीड करुन देण्याबाबत.

नागपूर महानगरपालिका ठराव क्र. ३९ दि. ०३.०३.१९५६ अन्वये १ आणा चौ.फुट प्रमाणे भंगी समाजाचे सफाई कर्मचा-यांची वसाहत तयार करण्याकरीता मौजा-जाटतरोडी/धंतोली येथील ४.५८ एकर जागा भंगी को-ऑप. हॉऊसींग सोसायटीला ३० वर्षाचे लीज करुन दिलेली आहे. सदर ठरावात खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद आहे.

१) ज्याअर्थी या वस्तीतील सार्वजनिक संडास व विहीरीसाठी झालेला खर्च रु. ५४००/- वजा जाता बाकी रु. ३६००/- या वस्तीच्या इतर दुरुस्तीकरीता म.न.पा.ने खर्च केलेले आहे. त्याअर्थी १ आणा प्रती चौ.फुट दराने येथील भुखंडके ३० वर्षाकरीता भाडेपट्टा दराने दयावे.
२) वरिल दराप्रमाणे प्रत्येक भुखंडाचे जे प्रिमीयम येईल ते प्रिमीयम म्हणून वसुल करावे व त्यावर नेहमीप्रमाणे शेकडा रु. २/- दराने भुभाडे आकारण्यात यावे.
३) वरिल सवलतीचे दराने या योजनेतील भुखंड महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या भंगी समाजाच्याच कर्मचा-यांना देण्यात यावा.
४) या वस्तीचा अभिन्यास ठक्करग्राम धर्तीवर योग्य त-हेने करावा.

**विषयांकित प्रकरणातील ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे आहे. :-**

- मनपा ठराव क्र. ३९ दि. ०३.०३.१९५६ अन्वये मौजा - धंतोली येथील ४.५८ एकर जागा भंगी को. ऑप.हा. सोसायटीला सन १९५६ मध्ये ३० वर्षीय स्थायी भाडेपट्ट्यावर (निवासी वापरासाठी) आवंटीत

करण्यात आलेली आहे. ३० वर्षाची लीज सन-१९८६ ला संपुष्ठात आलेली असून भाडेपट्टयाचे नुतनीकरण सोसायटीने केलेले नाही.

- भंगी को. ऑप. हा. सोसायटीने ना.सु. प्र. तर्फे एकुण ७६ भूखंडाचा अभिन्यास मंजूर करुन त्यावर सोसायटीद्वारे सभासदासाठी क्वार्टर बांधण्यात येवून ती ७१ सभासदांना आवंटीत केल्याची नोंद मूळ नस्तीत यादी उपलब्ध आहे.
- नगर भुमापन विभागाचे आखीव पत्रिकेनुसार, हक्काचा मुळधारक महानगरपालिका, पट्टेदार भंगी को. ऑप. हा. सोसायटी असून इतरभार म्हणून सभासदाचे नाव नमूद आहे. परंतु सोसायटीद्वारे सभासदांना अॅलॉटमेंट पत्रक दिल्याचे दस्तावेज नस्तीत उपलब्ध नाही.
- भंगी को. ऑप हा, सोसायटी सद्यास्थितीत बरखास्त असून मुख्य अवसायक यांची नेमणूक झालेली आहे.

भंगी को. ऑप. हा. सोसायटीमधील सभासदांना स्वतंत्र लीज करुन देणेबाबत उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांचे पत्र क्र. उपनिश-१/नियमन/गृहनिर्माण/सुनावणी/२९२५/२०२२ दि. २४.०५.२०२२ तसेच दि. २१.०७.२०२२ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे. तसेच परीसरातील लोकप्रतिनीधी द्वारे सुध्दा सदर मागणीबाबत निवेदने प्राप्त आहेत. सोसायटी मधील वास्तव्यात असलेले सभासद व वारसांनी भंगी समाज युवा मंच द्वारे सदर मागणी केलेली आहे.

मुख्य अवसायक, भंगी गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादीत नागपूर यांनी मौजा-धंतोली जाटतरोडी येथील भुमापण क्र. ६७७ येथील जागेवरील सभासदांवर दि.महाराष्ट्र स्टेट कॉ. हॉ. फायनान्स लि. मुंबई कडुन कोणत्याही प्रकारचे कर्ज/गहाण नसुन वास्तव्य करीत असलेल्या सभासदांना/वारसदारांना/भुखंडधारकांना स्वतंत्र लीज डीड करुन देण्यास हरकत नाही असे मुख्य अवसायक यांनी दि.१५.०१.२०२४ रोजी लेखी पत्र दिले आहे.

भंगी गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादीत नागपूर संस्थेचे मुख्य अवसायक यांना महाराष्ट्र को-ऑप. सोसायटीज अॅक्ट १९६० नुसार सर्व अधिकार प्राप्त असल्याने मागणी केल्यानुसार सोसायटीच्या नावे सदर जागेचे नुतनीकरण न करता सभासद/वारसदार/भुखंडधारकांकडुन मागील थकीत भुभाडे व इतर शुल्क वसुल करुन भाडेपट्टयातील सर्वसाधारण अटी व शर्तीप्रमाणे पुढील १० वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक आहे.

करिता उपरोक्त प्रमाणे, मौजा-धंतोली शिट क्र.(६१) १४ III न.भु.क्र. ६४८ ते ७२४ आराजी ४.५८ एकर जागेवरील भंगी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर संस्थेला दिलेल्या जागे अंतर्गत न.भु. विभागाचे आखीव पत्रिकेवर इतर भारात नमूद असणाऱ्या ७६ प्रकरणामध्ये, आखीव पत्रिकेवर नमूद क्षेत्रफळापुरता ज्यांचे नाव असेल त्यांच्या नावाने किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना वैयक्तिक लीज डीड करुन देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**